ग्रामीण कृषि मौसम सेवा
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी – ४३१ ४०२
ईमेल – gkmsparbhani@gmail.com

# कृषि हवामान सल्ला पत्रक क्रमांक - २५/२०१९-२०

मंगळवार, दिनांक - २५.०६.२०१९

## मराठवाडयाकरीता चालु आठवडयातील हवामान अंदाज (दिनांक २६ ते ३० जुन, २०१९)

| हवामान घटक | जिल्हयाचे नांव | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | औरंगाबाद | बीड | हिंगोली | जालना | लातुर | नांदेड | उस्मानाबाद | परभणी |
| पाऊस (मिमी) | ९५.० | ५८.० | १४.० | ४८.० | ५५.० | ३५.० | ४८.० | ३८.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३०.०-३२.० | २९.०-३०.० | ३१.०-३४.० | २९.०-३१.० | २९.०-३१.० | ३२.०-३४.० | ३१.०-३३.० | ३१.०-३४.० |
| किमान तापमान (अं.से.) | २२.०-२५.० | २२.०-२४.० | १९.०-२२.० | २१.०-२४.० | २१.०-२३.० | २०.०-२२.० | १९.०-२०.० | १९.०-२२.० |
| ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७४ - ७७ | ७२ - ७५ | ६४ - ६९ | ७२ - ७५ | ७२ - ७६ | ६३ - ६५ | ७४ - ७८ | ६८ - ६९ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४६ - ५८ | ४७ - ५५ | ४१ - ४७ | ४७ - ५० | ४६ - ५३ | ३८ - ४५ | ४८ - ५७ | ४२ - ४६ |
| वा-याचा वेग (किमी/तास) | १४ - २४ | १६ - २७ | १६ - २६ | १५ - २३ | १९ - २७ | १५ - २६ | १९ - २५ | १६ - २५ |
| वा-याची दिशा | पश्चिम ते वायव्य | पश्चिम | पश्चिम | पश्चिम ते वायव्य | पश्चिम | पश्चिम | पश्चिम | पश्चिम |

पेरणीयोग्य पाऊस (७५ मिमी पेक्षा जास्त) झाला असल्यास जमिनीत पुरेसा ओलावा असल्याची खात्री करूनच बिजप्रक्रीया करून पिकांची पेरणी करावी. जमिनीत पुरेसा ओलावा नसल्यास शेतक-यांनी पेरणीची घाई करू नये.

| पिकांचे नाव | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| कापूस | बिजप्रक्रीया | कापूस बियाण्यास थारयम ७५ टक्के ६ ग्रॅम प्रती किलो बियाणे किंवा कार्बेन्डेझीम ५० टक्के १.५ ग्रॅम प्रती किलो बियाणे किंवा कार्बेक्झिम ७५ टक्के १० ग्रॅम प्रती किलो बियाणे याप्रमाणात मिसळून बिजप्रक्रीया करावी. अॅझोटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळविणारे जिवाणू प्रत्येकी २५० ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५० ग्रॅम प्रती १० किलो बियाण्यावर बिजप्रक्रीया करावी. बियाणे अर्धातास सावलीत सुकवून पेरणी करावी. |
| सोयाबीन | बिजप्रक्रीया | सोयाबीन बियाण्यास पेरणीपूर्वी मिश्र उत्पादन थायरम + कार्बोक्झिम २:१ याप्रमाणात ३.० ग्रॅम / कि.ग्रॅ. ची बिजप्रक्रिया करावी. तसेच ट्रायकोडर्मा व्हिरीडी (८ - १० ग्रॅम / कि.ग्रॅ. बियाणे) चा सुध्दा यासाठी वापर करावा. या बुरशीनाशकांच्या बिजप्रक्रियेनंतर बियाण्यास रायझोबियम जिवाणू खत (ब्रेडी रायझोबियम) + स्फुरद विरघळविणारे जिवाणू खताची (पी.एस.बी.) २५० ग्रॅम प्रती १० किलो किंवा १०० मिली / १० किलो ग्रॅम (द्रवरूप असेल तर) याची बिजप्रक्रिया करावी. त्यानंतर बीयाणे सावलीमध्ये वाळवून शक्य तेवढया लवकर पेरणी करावी. बिजप्रक्रियेसाठी वनामकृवि, परभणी निर्मित द्रवरूप जैविक खताचाही उपयोग करता येतो. |
| तुर | बिजप्रक्रीया | तुर पिकास पेरणीपूर्वी २.५ ग्रॅम थायरम किंवा कार्बोक्झिम १.५ ते २.० ग्रॅम किंवा ३ ते ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा पावडर प्रती किलो बियाण्यास चोळावे. त्यानंतर रायझोबियम जिवाणूसंवर्धक + स्फुरद विरघळणारे जिवाणू संवर्धक (पीएसबी) २५० ग्रॅम प्रती १० किलो बियाण्यास लावून सावलीत वाळवूण पेरणी करावी. |
| मुग / उडीद | बिजप्रक्रीया | मुग / उडदी पेरणीपूर्वी बियाण्यास प्रती किलो कार्बोक्झिम १ ग्रॅम किंवा थायरम २ ग्रॅम चोळावे तसेच ट्रायकोर्डमा ४ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास बिजप्रक्रीया केल्यास बुरशीजन्य रोगापासून पिकाचे संरक्षण होते. त्याचबरोबर १० किलो बियाण्यास जिवाणूसंवर्धक रायझोबियम व पीएसबी प्रती २५० ग्रॅम लावून पेरणी करावी. |
| खरीप ज्वारी | बिजप्रक्रीया | खरीप ज्वारी पिकाच्या पेरणीपूर्वी बियाण्यास गंधक ३०० मेश ४ ग्रॅम किंवा थायरम ७५ टक्के ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे याप्रमाणात बिजप्रक्रीया करावी. २०० ग्रॅम कार्बोसल्फान (२५ एसडी) १ किलो बियाण्यास चांगले मिसळावे. अॅझोटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जिवाणू (पीएसबी) प्रत्येकी २५० ग्रॅम प्रती १० किलो बियाणे याप्रमाणात बियाण्यास चोळावे व अर्धा तास सावलीत सुकवावे. |
| बाजरी | बिजप्रक्रीया | बाजरी पिकाच्या पेरणीपूर्वी बियाण्यास मेटालॅक्झील / अॅप्रॉन ३५ टक्के एसडी ६ ग्रॅम प्रती किलो बियाणे यापमाणे बिजप्रक्रीया करावी. २५० ग्रॅम अॅझोस्पिरीलम १० किलो बियाण्यास चोळून पेरणी करावी. शेवटी अॅझोटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जिवाणू (पीएसबी) प्रत्येकी २५० ग्रॅम प्रती १० किलो बियाणे याप्रमाणात बियाण्यास चोळावे व बियाणे अर्धा तास सावलीत सुकवावे. |
| मका | बिजप्रक्रीया | मका पिकावरील लष्करी अळीच्या व्यवस्थापनासाठी बियाण्यास सायएन्ट्रीनिलीप्रोल १९.८० टक्के + थायोमिथॉक्झाम १९.८० टक्के ४ मिली प्रती किलो बियाण्यास बिजप्रक्रीया करावी. अॅझोटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जिवाणू (पीएसबी) प्रत्येकी २५० ग्रॅम व ट्रायकोड्र्मा ५० ग्रॅम प्रती १० किलो बियाणे याप्रमाणात बियाण्यास बिजप्रक्रीया करावी व बियाणे अर्धा तास सावलीत सुकवावे. |
| भुईमूग | बिजप्रक्रीया | भुईमूग पिकास थायरम ५ ग्रॅम अथवा कॅप्टन / कार्बेन्डॅझिम २ ग्रॅम प्रती किलो बियाणे याप्रमाणात बिजप्रक्रीया करावी. रायझोबियम आणि स्फुरद विरघळविणारे जिवाणू (पीएसबी) प्रत्येकी २५० ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५० ग्रॅम प्रती १० किलो बियाणे याप्रमाणात बिजप्रक्रीया करावी व बियाणे अर्धा तास सावलीत सुकवावे. |
| पशुधन व्यवस्थापन | -- | पाऊस पडल्यानंतर मराठवाडा सारख्या कोरडया हवामानाच्या भुभागावर आर्द्रता निर्माण होऊन अनेक परजिवींची वाढ गतीने होते व अशा परजिवींची लागण पाऊस पडल्यानंतर तात्काळ होते, म्हणून पशुधनामध्ये (गाय, म्हैस, शेळी, मेंढी) परजिवींची लागण टाळण्यासाठी प्रौढ शेळी व मेंढीमध्ये पाऊस पडल्यानंतर तात्काळ पडकावर चारावयास नेण्यापूर्वी एक जंतनाशक औषधाची मात्रा दयावी. |

सदर कृषि सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.

मुख्य प्रकल्प समन्वयक
ग्रामीण कृषि मौसम सेवा
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी